# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३६–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. श्रीरंग रामू यादव,<br>मु.पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. श्रीरंग रामू यादव, मु.पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली यांनी वि.प.कडे घरगुती विद्युत पुरवठा मिळावा यासाठी दि. ३०.११.२००९ ला अर्ज केला व त्यासाठी भरावी लागणारी फी रु. २५/– पोष्टाच्या मनीऑर्डरने पाठविली. अर्जदाराने वायफळे येथील गट क्र. २१५ येथे विद्युत पुरवठा घेवू इच्छित आहे असे नमूद केले आहे.

तक्रारदाराचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वितरण वाहिनीचा विस्तार असलेने अर्जदाराचा अर्ज प्राप्त झालेपासून १ महिन्याचे आंत वि.प.ने चलन देणे गरजेचे आहे. त्यानंतर तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ३०.११.२००९ रोजी दाखल केला. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. १०८४२ दि. ४.१२.२००९ नुसार भरपाईबाबत निर्देश केले आहेत की, जर कृती मानके साध्य करण्यात वितरण कंपनीला अपयश आल्यास तक्रारदारास भरपाई द्यावी लागेल. प्रस्तुतची तक्रार दिनांक ११.२.२०१० रोजी दाखल केली आहे. अर्ज दिलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष चलन मिळेपर्यंत झालेल्या विलंबाबाबत कृती मानकानुसार भरपाई मिळावी अशी तक्रारदाराने मागणी केली आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे. वि.प.ने आपल्या दि. ३१.३.२०१० चा लेखी अहवालात जो मंचामध्ये सुनावणीचे वेळी दि. ७.४.२०१० मंचामध्ये दाखल केला आहे, त्यात तक्रारदाराचा अर्ज दि. ३०.११.२००९ रोजी मिळाल्याचे मान्य केले आहे व त्यांस दि. २९.१२.२००९ रोजी चलन देण्यात आले आहे.

मंचासमोर तक्रारीची सुनावणी दि. ७.४.२०१० रोजी घेतली असता प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग हजर. वि.प.तर्फे असे सांगण्यात आले की, ३०.११.२००९ ही अर्जाची तारीख विचारांत घेता १ महिन्याचे मुदतीपूर्वी म्हणजें दि. २९.१२.२००९ ला चलन देण्यात आले आहे, कृती मानके विनियमातील तरतुदीची पूर्तता करण्यास विलंब झालेला नाही, त्यामुळे तक्रार निकाली काढण्यात यावी. या उलट, ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी चलन दि. २९.१२.२००९ ला दिल्याबाबत वि.प.तर्फे कांहीच पुरावा हजर केलेला नाही त्यामुळे त्यांचे म्हणणे ग्राह्य धरु नये असे म्हटले आहे. तक्रारदाराने मंचाला अग्रेषित केलेला दि. २०.४.२०१० चा अर्ज प्राप्त झाला असून त्यामध्ये त्यांना घर क्र. २१५ मध्ये ०.५० के.डब्ल्यू. घरगुती कनेक्शनसाठी चलन दि. २९.१२.२००९ ला मिळाले व वितरण कंपनी विरुध्द कोणतीही तक्रार नाही असे म्हटले आहे. तक्रारदाराचे प्रतिनिधी आज दि. ३.५.२०१० रोजी मंचासमोर उपस्थित राहिले नाहीत, त्यामुळे तक्रारदाराच्या अर्जाबाबत त्यांचे म्हणणे उपलब्ध झाले नाही.

तक्रारदाराचा अर्ज वि.प.कडे दि. ३०.११.२००९ रोजी मिळाला याबद्दल कुठलाही वाद नाही. कृती मानकातील तरतुदीनुसार १ महिन्याचे मुदतीत म्हणजे दि.२९.१२.२००९ पर्यंत तक्रारदारास चलन देणे आवश्यक होते, परंतु वि.प.ने आपल्या लेखी जबाबात व तक्रारदाराचा अर्जात दि. २९.१२.२००९ ला चलन मिळाल्याचे म्हटले आहे. परंतु तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी चलन दि. २९.१२.२००९ ला दिल्याबाबत वि.प.तर्फे कांहीच पुरावा हजर केलेला नाही त्यामुळे त्यांचे म्हणणे ग्राह्य धरु नये असे म्हटले आहे. परंतु अंतर्गत कक्षाचे दि. ४.१२.२००९ रोजी आदेश पारित झालेले आहेत. त्यामुळे वि.प.ने त्या आदेशाप्रमाणे पूर्तता करुन चलन दिले असावे असे संयुक्तिक वाटते. केवळ २९.१२.२००९ ला चलन दिल्याचा पुरावा नाही यावरुन भरपाईचे आदेश वि.प.स देणे संयुक्तिक होत नाही असे वाटते. वि.प.तर्फे मंचासमोर तक्रारदारास २९.१२.२००९ ला चलन दिल्याचे दुसऱ्यांदा मंचासमोर सांगितले. त्यामुळे प्रथमदर्शनी चलन मुदतीत दिले आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे तक्रारदार यांस भरपाई मिळण्याचा हक्क नाही. वि.प.कडून कृती मानके साध्य करण्यात अपयश आल्याचे दिसून येत नाही. तक्रार निकाली काढण्यात येत असून खालील प्रमाणे आदेश –

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने मंच कार्यान्वित नसल्याने १०० पेक्षा अधिक प्रकरणांची सुनावणी व निर्णय प्रलंबित राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५, क्र. ५:१ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीत निर्णय करणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार करणाविरहित आहे, ती फेटाळणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ३.५.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :